BEFORE THE HON'BLE ELECTRICITY OMBUDSMAN
NAGPUR

# CAMP AT AURANGABAD.

Representation No. 01/2011

Date of hearing : 20/11/2011

Appellant by his representative father Shri Vardhaman Nemichand Bakliwal, At post Puri, Tq. Gangapur, Dist. Aurangabad, in person and the respondent by Shri C.C.Humne, Executive Engineer, Rural Division, MSEDCL, Aurangabad and Shri S.V.Joshi, A.A. Gangapur Sub Division.

Parties are heard. The representative has filed Written arguments alongwith two documents

Matter matter is now closed for order

Electricity Ombudsman, Nagpur,
Camp at Aurangabad.

Date:- 20/11/2011

<u>BEFORE THE HON'BLE ELECTRICITY OMBUDSMAN</u>
<u>NAGPUR</u>

# <u>CAMP AT AURANGABAD.</u>

Representation No. 03/2011

Date of hearing : 20/11/2011

Appellant by Shri H.A.Kapadia, representative, Aurangabad, and the respondents by

(1) Shri C.C.Humne, Executive Engineer, Rural Division, MSEDCL, Aurangabad,

(2) Shri A.M. Nitnaware Executive Engineer, Rural Circle, MSEDCL, Aurangabad.

Parties are heard partly.

Matter is adjourned for further hearing.

Electricity Ombudsman, Nagpur,
Camp at Aurangabad.

Date:- 20/11/2011

BEFORE THE HON'BLE ELECTRICITY OMBUDSMAN
NAGPUR
CAMP AT AURANGABAD.

Representation No. 08/2011

Date of hearing : 20/11/2011

Appellant is present in person with her representative Shri H.A.Kapadia, Aurangabad, Respondent No.1 by Shri A.B. Deshpande, Executive Engineer, Nodal Office, Urban Circle, MSEDCL, Aurangabad and Respondent No.2 Shri K.D. Borde, Legal Manager,GTL Ltd., Aurangabad.

Parties are heard.

Matter is now closed for order

Electricity Ombudsman, Nagpur,
Camp at Aurangabad.

Date:- 20/11/2011

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/३२५/२०११/०५

तक्रार दाखल दिनांक :- ०८/०२/२०११
निकाल दिनांक :- ०७/०४/२०११

श्री वर्धमान नेमीचंद बाकलीवाल,
रा. पुरी, ह.मु.अरिहंत नगर,
औरंगाबाद.

(ग्राहक क्र. ५०६६८००००१४१) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत ग्रामीण विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | व्ही.बी.मंत्री | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्यसचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०८/०२/२०११ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल

अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २४/०२/२०११ रोजी ठेवण्यात आली.



ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. ग्राहकास दिनांक ०३/०२/२०११ रोजी विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६ (१) नुसार १५ दिवसात थकीत वीज बिल देयक रुपये ९४९३.६९/- भरण्याबाबत व भरणा न केल्यास विद्युत पुरवठा खंडीत करण्याबाबत नोटीस प्राप्त झाली आहे. ग्राहकाने त्याचा विज पुरवठा मार्च २००८ पासुन खंडीत असल्यामुळे वरील नोटीस अप्रस्तुत असल्याचे नमुद केले आहे. ग्राहकाने अंतीमतः दिनांक ०४/०६/२००८ रोजी रुपये १२९०/- वीज बिल भरले आहे. तसेच मार्च २००८ रोजी कायदेशीर सुचना न देता वीज पुरवठा खंडीत केल्याचे नमुद केले आहे. ग्राहकाने आपल्या तक्रारीमध्ये महावितरण कंपनीतर्फे देण्यात येणा-या वीज देयकाबाबत बरेच प्रश्न उपस्थित केले आहेत.

उदा.१) कंपनीतर्फे थकीतबाकीवर होणारी २४% व्याज आकारणी बेकायदेशीर आहे.
२) देयकामध्ये वसुल करण्यात आलेला स्थिरआकाराची रक्कम व इंधनभाराची रक्कम परत करावी.

२) ग्राहकाने आपल्या तक्रारीमध्ये महावितरण कंपनीने ११६४ युनिटचे वीज देयक रुपये ८२०९.५०/- जास्तीचे घेतलेले आहे असे नमुद करुन वरील रक्कम शेतीमध्ये गुंतविल्यास रुपये २६२४४८/- रुपयाचा फायदा झाला असता त्यामुळे वरील रक्कम महावितरण कंपनीने परत करावी अशी मागणी केली आहे. वारंवार तक्रारी करुनही त्याची दखल न घेतल्यामुळे रुपये १,०००००/- देण्याचे आदेश व सदर प्रकरणात खर्चाची रक्कम रुपये १०००/- देण्याविषयीचे आदेश द्यावे अशी विनंती मंचास केली आहे.

३) सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक २४/०२/२०११ व १४/०३/२०११ व २९/०३/२०११ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या दरम्यान नोडल अधिकारी प्रतिनिधी श्री एम.एन.ओव्हळ सहाय्यक अभियंता गंगापुर व वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी आपला लेखी जबाब, स्थळ निरिक्षण अहवाल व वीज दुरुस्ती अहवाल सादर केला. ग्राहकाने दिनांक ०४/०७/२००८ पासुन वीज देयकाचा भरणा केला नसल्याचे सांगुन ग्राहकाकडे जानेवारी २०११ अखेर प्रलंबित असलेले वीज देयक रुपये ८९४६.५२/- योग्य असल्याचे सांगुन ते भरणा करण्याबाबत आदेश ग्राहकास देण्याची विनंती मंचास केली. ग्राहकाने आपणास फेब्रुवारी २००८ पासुन वीज देयक प्राप्त झाले नसुन आपले कनेक्शन बंद असल्यामुळे दिनांक २९/०१/२०११ रोजी रुपये ९४९३.६९/- भरण्याची नोटीस भा.वि.कायदा २००३ चे कलम ५६ (१) नुसार बेकायदेशीर असल्याचे प्रतिपादन केले. दोन्ही बाजुकडुनचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेण्यात आले.

४) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाचा वीज पुरवठा महावितरण कंपनीकडुन माहे फेब्रुवारी २००८ मध्ये खंडीत करण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात ग्राहकाचा वीज वापर सुरुच होता. ग्राहकाचे सी.पी.एल.वर मार्च २००८ ते जुलै २०१० पर्यत वरील कनेक्शन बंद असल्याची नोंद आहे त्यामुळे ग्राहकास वरील कालावधीत वीज देयक देण्यात आले नाही.

कनिष्ठ अभियंता शेंदुरवादा यांनी दिनांक १९/०७/२०१० रोजी केलेल्या स्थळ निरीक्षण अहवालामध्ये वरील ग्राहक वीज पुरवठा वापरत असल्याचे सांगुन प्रत्यक्षात रेकॉर्डवर ग्राहकाचे



कनेक्शन कायमचे बंद असल्याची नोंद केली आहे. वरील स्थळ निरिक्षण अहवालामध्ये ग्राहकाचा वीज पुरवठा सुरु असुन मीटर रिडींग ११३४५ युनिट असल्याचे नोंद केली आहे. वरील स्थळ निरिक्षण अहवालानुसार ग्राहकास (११३४५-१०४५५)=८९० युनिटचे २८ महीन्यात विभाजन करुन रुपये ३४३६.५४ /- चे वीज देयक माहे ऑगस्ट २०१० च्या देयकामध्ये समायोजन करण्यात आले ते मीटर बदली अहवालानुसार योग्य आहे. ग्राहकाने त्याच्या तक्रारीमध्ये माहे मार्च २००८ ते जुलै २०१० या कालावधीतील देयक ऑगस्ट २०१० मध्ये दिल्यामुळे भा.वि.कायदा २००३ चे कलम ५६(१) प्रमाणे रद्द करण्यात यावे अशी विनंती मंचास केली आहे. वरील काळात कंपनीने ग्राहकाचा वीज पुरवठा खंडीत केला होता याबाबत ठामपणे प्रतिपादन केले नाही अथवा पुरावा सादर केला नाही. तसेच ग्राहकाने आपला वीज पुरवठा वरील काळात खंडीत होता असे सांगीतले परंतु तो कसा आणि केव्हा सुरु झाला याबाबत उल्लेख केला नाही. ग्राहकाने वरील २८ महीन्यामध्ये वीजेचा वापर केला असुन कंपनीने वीज पुरवठा खंडीत झाल्याची चुकीची नोंद केल्यामुळे ग्राहकास वीज देयक प्राप्त झाले नाही.ग्राहकाने वरील २८ महीन्याचे कालावधीत आपणास वीज देयक मीळत नाही याबाबत कोणतेही तक्रार महावितरण कंपनीकडे केली नसल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे कलम ५६(१) नुसार वीज देयक भरण्यातुन सुट देण्यात यावी हे ग्राहकाचे प्रतिपादन ग्राह्य धरणे योग्य होणार नाही असे मंचाचे मत आहे.

५) ग्राहकाने आपले तक्रारीमध्ये वीज देयकात लावण्यात आलेल्या व्याज,विलंब आकार, स्थिर आकार इंधन अधिभार आकारण्याविषयी प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याबाबत नोडल अधिकारी यांनी मा.वीज नियामक आयोगाचा आदेश दिनांक १२/०९/२०१०ची प्रत सोबत जोडली आहे. ज्यामध्ये ग्राहकाने उपस्थित केलेल्या वरील प्रश्नाबाबत सविस्थर माहीती दिलेली आहे.ग्राहकाने याशिवाय उपस्थित केलेले प्रश्न या तक्रारीशी व मंचाच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत नसल्यामुळे त्याबाबत दखल घेण्यात येत नाही. महावितरण कंपनीने ग्राहकास दिलेले माहे जानेवारी २०११ अखेरचे वीज देयक रुपये ८९४६.५२/- योग्य असुन ते ग्राहकाकडुन वसुल करावे. किंवा भा.वि.कायदा कलम ५६(१) नुसार योग्य कारवाई करावी.

# आदेश

१) ग्राहकाची तक्रार खरीज करण्यात येत आहे.

| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **व्ही. बी. मंत्री** |
|---|---|---|
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |